औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

" बां ध का मा चा प र वा ना "

COMMENCEMENT CERTIFICATE

सुधारित बांधकम परवानगी

परवाना क्रमांक :- 23 /२०२२-२३

फाईल क्रमांक :- ८१४/१७/२०२१-२२ **दिनांक :** 20/08/2022

परवाना धारण करण्यांचे नाव :- श्री. अरुण पिता बालकिशनराव पारगांवकर

गट क्रमांक :- १०३/पैकी, मौजे :- हर्सूल औरंगाबाद

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबंधित नियमास अनुसरुन खालीलप्रमाणे बांधकामाची/दुरुस्तीची परवानगी दिली जाते. सदरील परवान्याचा अंमल आज तारखे पासुन **एक** वर्षापर्यंत राहील. बांधकाम पूर्ण झाल्याबाबत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी. नगर रचनाकार यांनी **लाल** रंगाने दुरुस्ती/ मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटींवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुषंगाने दिला जात आहे. यामध्ये नमुद केलेल्या भूखंडा संबंधी भविष्यात कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधात बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी / वाद न्यायालयामार्फत परस्पर दुर करुन घ्याव्यात या संबंधाने उद्‌भवणाऱ्या कोणत्याही बाबींची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कास बाधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्यामार्फत भूखंड आखणी करुन घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेऊ नये. याबाबत दिनांक **१९/०८/२०२२** रोजी दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

०५. सदर भूखंडास/ मिळकतीस अप्पर तहसिलदार, औरंगाबाद यांचे मार्फत महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम-४२ अ मधील तरतुदीमध्ये जमीनीचा भोगवटा, वर्ग व भार यांच्या विनिश्चतीबाबतचे प्रमाणपत्र ६० दिवसांच्या आत/ जोत्याचे प्रमाणपत्र घेणेपूर्वी प्राप्त करुन या कार्यालयात दाखल करावा.

०६. या कार्यालयाचे संबंधीत अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता त्यांचे अवलोकनार्थ मंजुरीचे संबंधीत कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्यापर्यंत (Plinth Level) चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे व Plinth Level Completion प्रमाणपत्र कार्यालयातर्फ घेणे आवश्यक आहे.

०८. मंजुर बांधकाम नकाशाच्या विरुध्द जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-४३ सह ५२, कलम-५४, कलम-५३ प्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) घेण्यात यावे व त्यानंतरच इमारतींचा वापर सुरु करावा नसता आपल्या विरुध्द म.प्रा.नि.व न.र. अधि.१९६६ चे कलम-५३ अन्वये पूढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका परवानाधारक प्लंबरचे जलनि:सारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करुन विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोषकूप) तयार करुन त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. यापुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (५३४/२०२१-२२) शहर विकास निधी रक्कम रु. **२५,३४०/- च.क्र. २७७९३** दि. **०६/१०/२०२१** भरणा केला आहे. आता शहर विकास निधी रक्कम रु. **११,३९,९३०/- च.क्र. ३०४५३** दि. **३१/०३/२०२२** भरणा केला आहे.

१३. यापुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (५३४/२०२१-२२) स्वंयम विकास रक्कम रु. **३,००,०००/-** च.क्र. **२७७९४** दिनांक **०६/१०/२०२१** रोजी जमा केली आहे.

१४. यापुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (५३४/२०२१-२२) जमीन विकास शुल्क रक्कम रु. **१३,६२,०००/-** च.क्र. **२७७९२** दिनांक **०६/१०/२०२१** रोजी जमा केली आहे.

१५. भोगवटा प्रमाणपत्र घेणे पूर्वी सामासातील अंतरामध्ये कमीत कमी (२२८) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१६. जागेवरील झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणा मार्फत परवानगी घेण्यात यावी.

१८. जागेवर विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी संबंधीत खात्याकडून काढुन घ्यावी, नंतरच बांधकाम सुरु करावे.

१९. अंतर्गत विकासाच्या कामा बाबत (Self Development) आदेश क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/ **२०१७/९३९** दिनांक **२९/०४/२०१७** चा आदेश अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

२०. सदरील योजने (Scheme) मधील सर्व रस्ते, पाणी पुरवठा, जलनिसा:रण, विद्युत, दिवा बती इत्यादी सर्व सोई सुविधांची देखभाल दुरुस्तीची कायम स्वरुपी जबाबदारी विकासक तथा या योजनेतील सर्व गाळेधारक यांची राहील.

२१. अंतर्गत विकासाची करावयाची कामे.

१) अंतर्गत रस्ते खंडीकरण व डांबरीकरण अथवा काँक्रेटीकरण करणे. (यात गृह निर्माण योजनेतुन जाणाऱ्या विकास योजना रस्त्याचा त्याचा मालकी हक्क मर्यादेपर्यंत विकास करण्याचा समावेश राहील. (२) जलनि:सारण व जलवाहिनी टाकणे. (३) विद्युत खांबासह विद्युत दिवे लावणे. (४) आवश्यकता असल्यास नाला ट्रेनिंगसाठी रिटेनिंग वॉल बांधणे. (५) जलनि:सारणाची महानगरपालिकेचे जलनि:सारण वाहिनीस जोडणी होईपर्यंत सार्वजनिक एकत्रित स्वरुपात वा आवश्यक असल्यास वैयक्तिक स्वरुपात आवश्यक त्या क्षमतेचा Septic Tank बांधणे. Waste Water Treatment Plant बांधणे व Operate व Maintenance करणे. (६) पाणी पुरवठा (जलवाहीनी) ची कामे करणे.(७) रस्त्यालगत गटाराची व्यवस्था करणे. (८) खुल्या जागेचा सर्वकष विकास करणे.(०९) प्रस्तावित सर्व इमारतींसाठी पोच रस्त्याचा सर्वकष विकास करणे.

वर नमुद अंतर्गत विकासाची कामे पुर्ण करुन त्या बाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्र वेळी सादर करावीत. या बाबत दिनांक १२/०४/२०२२ रोजी दिलेले नोटरीकृत हमीपत्र अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील. (नोटरी **विधिज्ञ श्री. सय्यद एजाजअली**)

२२. महाराष्ट्र मालकी हक्काचा (बांधकामाचे प्रवर्तन, व्यवस्थापन आणि हस्तांतरण यांचे नियमन) अधिनियम १९६९ चे कलम ३ मधील देण्यात आलेल्या जबाबदाऱ्याचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. तसेच कलम-१० नुसार सहकारी संस्था नोंदविणेसाठी आवश्यक सभासद संख्या झाल्यानंतर विकासकाने चार महिण्याच्या आत संस्थेची नोंदणी करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२३. महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट अधिनियम १९६३ चे कलम-११ नुसार विकासकाने सहकारी संस्था किंवा लिमीटेड कंपनी स्थापन केल्यानंतर इमारत बांधलेल्या जमीनीचे हक्क हितसंबंध संस्था नोंदविल्यापासून चार महिण्याच्या आत संस्थेस हस्तांतरीत करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२४. बांधकाम परवानगी आदेशामधील सर्व अटींची माहिती गाळेधारक, फ्लॅट धारकांना देणे विकासकावर बंधनकारक राहील.

२५. अंतर्गत विकासाची कामे अर्जदार स्वत: करणार आहेत. अंतर्गत विकास कामासाठी महानगरपालिका कोणताही खर्च करणार नाही. तसेच अर्जदार/ संस्था कोणत्याही नागरी सुविधाची मागणी महानगरपालिकेकडे करणार नाही. अंतर्गत विकास कामा बाबत नोटरीकृत शपथपत्र / करारनामा दिलेला आहे. सदर शपथपत्र अर्जदारावर बंधनकारक राहील.

२६. अंतर्गत विकासाच्या कामाची कायमस्वरुपी देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

२७. जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापूर्वी सर्व इमारती सक्षम कार्यालया मार्फत मोजणी नकाशावर बसवून तसा मोजणी नकाशा या कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

२८. विकास नियंत्रण नियमावलीनुसार Waste Water Recycling, Solar System &, Rain Water Harvesting करीताची अंमलबजावणी करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

२९. बांधकामाच्या इमारतींना जाळीद्वारे बंदिस्त व आच्छादित करुन त्या संदर्भाने इतर सुरक्षात्मक उपाय योजना करणे तसेच सार्वजनिक रस्त्यांवर आणि सार्वजनिक जागांवर बांधकाम साहित्याची साठवणूक न करणे व इमारतींच्या बांधकामामुळे निर्माण होणारी धुळ हवेत पसरुन हवेचे प्रदुषण होणार नाही या संदर्भाने दक्षता घेणे अर्जदारास/विकासकास बंधनकारक राहील.

३०. सदर बांधकामा करीता आवश्यक असणारे पाणी महानगरपालिकेच्या जल मल केंद्रातून (**STP**) उपलब्ध करुन घेण्यात यावे. भोगवटा प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत इमारतीच्या बांधकामास आवश्यक पाणी सदर केंद्रामधून उपलब्ध करुन घेतल्याबाबतचे संबंधीत विभागाचे प्रमाणपत्र सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

३१. Promoter should obtain Maha RERA Registration as per section 3 of the Real Estate (Regulation & Development) Act,2016

३२. गट क्रमांक १०३ मौजे हर्सूल औरंगाबाद हा संपूर्ण गट अर्जदाराच्या मालकीचा असून, गट नंबर १०३ करीता गट क्रमांक १०४/१ मधुन ९.०० मीटर रुंदीचा रस्ता देणा बाबत अर्जदार यांनी दिलेले नोटरीकृत संमतीपत्र अर्जदारास कायमस्वरुपी बधनकारक राहील.

३३. प्रस्तावित मिळकतीस पोच रस्ता उपलब्ध होण्याच्या दृष्टिन मिळकतीमधील ९.०० मीटर रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र १३५०.०० चौ.मी. महानगरपालिकेस नोदणीकृत हक्कसोड प्रमाणपत्र अगग-१-७२१२/२०२१ दि. ११/१०/२०२१ अन्वये हस्तांतरीत करुन दिले आहे. त्यांची नोंद ७/१२ उताऱ्यावर ३० दिवसाच्या आत घेऊन तसा ७/१२ उतारा सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

३४. प्रस्तावित मिळकती ही औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना सन १९९१ (वाढीव हद्द) नुसार ना-विकास (No Development Zone) क्षेत्रात समाविष्ट असून, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) नियम क्रमांक ७.७.२ नुसार सदरील क्षेत्रावर EWS/LIG समुह गृह निर्माण योजना ३०.०० चौ.मी. ५०.०० चौ.मी. बांधकाम क्षेत्र मर्यादेत बांधकाम परवानगी अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३५. या पूर्वी बांधकाम परवानगी स.क्र ४५७/१७/२०२१-२२ बांधकाम परवाना क्र. ५३४/२०२१-२२ दि. १८/१०/२०२१ अन्वये दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात येत असून त्यामधील अटी अर्जदार यांच्या बंधनकारक राहील.

३६. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही. जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरीक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी आपणांस पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तरी पाणी पुरवठा बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

(प्रशासकीय तजविज दि. ०५/१०/२०२१)

प्रशासक,
औरंगाबाद महानगरपालिका,
यांचे करीता.
O.C. Signed By D.D.T.P.

प्रतिलिपी :-

०१. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

०२. प्रशासकीय अधिकारी विभाग क्रमांक ०४ यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

सूचना

०१. जमीनीचे अनाधिकृत प्लॉटींग/गुंठेवारी करणे /विना परवानगी बांधकाम करणे, मंजूर परवानगीचे विरोधात बांधकाम करणे , भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याविना इमारतीचा वापर करणे, परवानगी विना जमीनीचा/इमारतीचा वापर बदलेणे, मंजूर परवानगी आदेशातील अटी शर्तीचे उल्लंघन करणे, इत्यादी बाबी या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ,१९६६ चे कलम ५२,५३,५४, च्या तरतुदीनुसार **अजामीनपात्र दखलपात्र गुन्हा** (Nonbailable Cognizable Offence) ठरविण्यात आले असून **अपराध सिध्द झाल्यानंतर** (After Conviction) संबधीत जमीन मालक , विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता,भोगवटादार या पैकी जे कोण संबंधीत असतील त्यांना **एक महीना** ते **तीन वर्षे** पर्यंत **कैद** किंवा रुपये २०००/- ते रुपये ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही या प्रमाणे शिक्षेची तरतुद आहे .

०२. वरील प्रकारच्या **अनाधिकृत विकासाबाबत** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम ,१९६६ चे कलम - ५२, ५३, ५४ नुसार औरंगाबाद महानगरपालिका इरत कोणतीही संबंधीत जमीन मालक, विकासक, गुत्तेदार , अभिकर्ता, भोगवटा धारक, यांचे विरोधात **संबंधीत पोलिस स्टेशन कडे** लेखी फिर्याद दाखल करू शकते. (महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासकीय परिपत्रक क्रमांक टी. पी.बी ४३८३ /१६५९/यु.डी.- ५ दि. १५ जुन १९८३).

०३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ (१) नुसार वरील अनुक्रमांक १ मध्ये नमुद अनाधिकृत विकास हे **कायमस्वरूपी अनाधिकृत विकास** ठरविण्यात आले असुन कितीही वर्षा नंतर तो उघडकिस आल्यावर त्यांचे विरोधात **औरंगाबाद महानगरपालिका** किंवा इतर संबंधित शासकीय/ निमशासकीय संस्था किंवा **खाजगी व्यक्ती** वरील अनाधिकृत विकासाचे संबंधित जमिन मालक, विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटादार जे जे कोण संबंधित असतील त्यांचें विरूध्द पोलिस स्टेशनकडे लेखी फिर्याद दाखल करू शकते .

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद

(अकृषिक शाखा)

वाचा :-1) शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र.एनएपी-2016/प्र.क्र.7/टी-1, दिनांक 22जानेवारी 2016.

2) महाराष्ट्र शासन, राजपत्र, महसूल व वनविभाग दिनांक 5 जानेवारी 2017.

3) मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश क्र.2021/मशाका/जमीन-1/एनएपी-34/ प्र.क्र. 04 , दि.29/01/2021.

4) अर्जदार श्री. अरुण बालकिसनराव पारगावकर,रा.औरंगपुरा,औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक 20/10/2021 व दिनांक 08.11.2021.

5) औरंगाबाद महानगर पालिका, औरंगाबाद यांचेकडील बांधकामाचा परवाना क्र.534/2021-22 फाईल क्र.457/17/2021-22, दिनांक 18/10/2021 व 3591 दि.29.10.2021 .

6) अपर तहसीलदार, औरंगाबाद यांचे पत्र क्र.2021/जमा-2/कावि-निरंक, दिनांक 27/10/2021.

7) भूसंपादन शाखा, उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांचे पत्र क्र.2021/अकृषिक /भूसं-नाहप्रप/कावि-41, दिनांक.28/10/2021.

8) उपसंचालक नगर रचना,महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्र क्र. मनपा/नरवि/ उसंनर/ 2021/ 3716, दिनांक 24.11.2021.

जा.क्र.2021/एनएपी-34/अकृषिक/मौजे हर्सुल, ता.जि.औरंगाबाद/प्र.क्र.84, दिनांक 13/12/2021

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42-अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमीनीच्या भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, **अर्जदार** श्री.अरुण बालकिसनराव पारगावकर,रा.औरंगपुरा,औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद यांनी जिल्हा **औरंगाबाद** तालुका **औरंगाबाद** मौजे **हर्सुल** च्या **ग. नं. 103** पैकी मधील **क्षेत्र 22700.00** चौ.मि. या जमीनीच्या भोगवट्दाराने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या कलम 42-अ च्या तरतूदीन्वये **निवासी** अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा प्रशासक, औरंगाबाद महानगर पालिका औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणाच्या विकास परवानगी / बांधकामाचा परवाना क्र. 534/2021-22,

फाईल क्र.457/17/ 2021-22, दिनांक 18/10/2021 अन्वये विकास परवानगी / बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी, उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम रुपये 1,22,580/- (**अक्षरी एक लाख बावीस हजार पाचशे ऐंन्शी रुपये फक्त)** चालान क्र MH00 9960645 202122M, दिनांक 10/12/2021 रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त संहितेमधील तरतूदीच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदींना आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यांत आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यांत येत आहे.

1) आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक. 31 जूलै 2022 रोजी संपणा-या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रु. **0.90** पैसे प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिका-याकडून वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

2) उक्त जमीनीचा भोगवटादार उक्त जमीनीवर वसूली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

3) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना देणे भोगवटारावर बंधनकारक राहील.

4) उक्त जमीनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उपविभागीय अधिका-यांस, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतूदीअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशा इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोटकलम (2) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

5) प्रस्तावित मिळकत औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना सन 1991 (वाढीव हद्द) नुसार ना-

विकास (No Development Zone) क्षेत्रात समाविष्ट असून एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन निमावलितील (UDCPR) नियम क्रमांक 7.7.2 नुसार सदरील क्षेत्रावर EWS/LIG समुह गृह निर्माण योजना 30.00 चौ.मि. व 50.00 चौ.मि. बांधकाम क्षेत्र मर्यादीत फेज -1 करीता काही भूखंडावर EWS/LIG स्वरुपात टेनामेंटचे 891.875 चौ.मि. क्षेत्राचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे.त्यासाठी बांधकाम परवानगी अनुज्ञेय करण्यात आलेली असून , फेज -2 मधील उर्वरित टेनामेंटसाठी 30.00 चौ.मि. 50.00 चौ.मि. मर्यादेतच बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय राहील.

6) UDCPR-एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्रमांक 7.2.2 मधील तरतुदी अर्जदारास बंधनकारक राहतील.सदर तरतुदी उल्लंघन केल्यास दिलेली सनद रद्द समजण्यात यावी.

7) अर्जदारास नियोजन प्राधिकरणाच्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

त्याची साक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक 13/12/2021 रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

(भोगवटादाराची स्वाक्षरी)

स्वा/-

(रामेश्वर रोडगे)
उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद

अ.वी.प/२१/१९२

श्री.अरुण बालकिसनराव पारगावकर.

(साक्षीदारांचे नांव व स्वाक्ष-या)

1) अनिल दौलतराव बोरसे

2) प्रशांत श्रीरंगराव साळवे

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: अर्जदार श्री.अरुण बालकिसनराव पारगावकर, रा.औरंगपुरा,औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद यांनी स्वाक्षरी केलेली आहे, ती हीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

प्रतिलिपी माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

1) मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, महानगर पालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
3) उप अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
4) अपर तहसीलदार, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
5) अर्जदार श्री.अरुण बालकिसनराव पारगावकर,रा.औरंगपुरा,औरंगाबाद,ता.जि.औरंगाबाद यांना माहितीस्तव.
6) तलाठी, साझा हर्सुल भाग- 2, ता. जि. औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(रामेश्वर रोडगे)
उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद